**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ___________________________
   (Name) ____________________________
2. (Signature) ___________________________
   (Name) ____________________________

OMR Sheet No. : ......................................
(To be filled by the Candidate)

Roll No. | | | | | | | | |

(In figures as per admission card)

Roll No.______________________________
(In words)

**D-3809**

**Test Booklet No.**

Time : **1 1/4** hours]

# PAPER-II
# MARATHI

[Maximum Marks : **100**

Number of Pages in this Booklet : **8**

Number of Questions in this Booklet : **50**

## Instructions for the Candidates

1. Write your roll number in the space provided on the top of this page.
2. This paper consists of fifty multiple-choice type of questions.
3. At the commencement of examination, the question booklet will be given to you. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as below :
   (i) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal and do not accept an open booklet.
   (ii) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to pages/questions missing or duplicate or not in serial order or any other discrepancy should be got replaced immediately by a correct booklet from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given.**
   (iii) After this verification is over, the Test Booklet Number should be entered in the OMR Sheet and the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each item has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the oval as indicated below on the correct response against each item.
   **Example :** (A) (B) ● (D)
   where (C) is the correct response.
5. Your responses to the items are to be indicated in the **Answer Sheet given inside the Paper I Booklet only.** If you mark at any place other than in the ovals in the Answer Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done in the end of this booklet.
8. If you write your name or put any mark on any part of the test booklet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return the test question booklet and OMR Answer sheet to the invigilators at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table etc., is prohibited.**
12. **Negative Marking :- For each incorrect answer, 0.5 marks shall be deducted.**

## परीक्षार्थियों के लिए निर्देश

1. पहले पृष्ठ के ऊपर नियत स्थान पर अपना रोल नम्बर लिखिए ।
2. इस प्रश्न-पत्र में पचास बहुविकल्पीय प्रश्न हैं ।
3. परीक्षा प्रारम्भ होने पर, प्रश्न-पुस्तिका आपको दे दी जायेगी । पहले पाँच मिनट आपको प्रश्न-पुस्तिका खोलने तथा उसकी निम्नलिखित जाँच के लिए दिये जायेंगे जिसकी जाँच आपको अवश्य करनी है :
   (i) प्रश्न-पुस्तिका खोलने के लिए उसके कवर पेज पर लगी कागज की सील को फाड़ लें । खुली हुई या बिना स्टीकर-सील की पुस्तिका स्वीकार न करें ।
   (ii) **कवर पृष्ठ पर छपे निर्देशानुसार प्रश्न-पुस्तिका के पृष्ठ तथा प्रश्नों की संख्या को अच्छी तरह चैक कर लें कि ये पूरे हैं । दोषपूर्ण पुस्तिका जिनमें पृष्ठ/प्रश्न कम हों या दुबारा आ गये हों या सीरियल में न हों अर्थात किसी भी प्रकार की त्रुटिपूर्ण पुस्तिका स्वीकार न करें तथा उसी समय उसे लौटाकर उसके स्थान पर दूसरी सही प्रश्न-पुस्तिका ले लें । इसके लिए आपको पाँच मिनट दिये जायेंगे । उसके बाद न तो आपकी प्रश्न-पुस्तिका वापस ली जायेगी और न ही आपको अतिरिक्त समय दिया जायेगा ।**
   (iii) इस जाँच के बाद प्रश्न-पुस्तिका की क्रम संख्या OMR पत्रक पर अंकित करें और OMR पत्रक की क्रम संख्या इस प्रश्न-पुस्तिका पर अंकित कर दें ।
4. प्रत्येक प्रश्न के लिए चार उत्तर विकल्प (A), (B), (C) तथा (D) दिये गये हैं । आपको सही उत्तर के दीर्घवृत्त को पेन से भरकर काला करना है जैसा कि नीचे दिखाया गया है ।
   **उदाहरण :** (A) (B) ● (D)
   जबकि (C) सही उत्तर है ।
5. प्रश्नों के उत्तर **केवल प्रश्न पत्र I के अन्दर दिये गये उत्तर-पत्रक पर ही** अंकित करने हैं । यदि आप उत्तर पत्रक पर दिये गये दीर्घवृत्त के अलावा किसी अन्य स्थान पर उत्तर चिह्नांकित करते हैं, तो उसका मूल्यांकन नहीं होगा ।
6. अन्दर दिये गये निर्देशों को ध्यानपूर्वक पढ़ें ।
7. कच्चा काम (Rough Work) इस पुस्तिका के अन्तिम पृष्ठ पर करें ।
8. यदि आप उत्तर-पुस्तिका पर अपना नाम या ऐसा कोई भी निशान जिससे आपकी पहचान हो सके, किसी भी भाग पर दर्शाते या अंकित करते हैं तो परीक्षा के लिये अयोग्य घोषित कर दिये जायेंगे ।
9. आपको परीक्षा समाप्त होने पर प्रश्न-पुस्तिका एवं OMR उत्तर-पत्रक निरीक्षक महोदय को लौटाना आवश्यक है और परीक्षा समाप्ति के बाद उसे अपने साथ परीक्षा भवन से बाहर न लेकर जायें ।
10. **केवल नीले/काले बाल प्वाईंट पैन का ही इस्तेमाल करें ।**
11. **किसी भी प्रकार का संगणक (कैलकुलेटर) या लाग टेबल आदि का प्रयोग वर्जित है ।**
12. **नेगेटिव अंक प्रणाली : प्रत्येक गलत उत्तर के लिए 0.5 अंक काटे जाएँगे ।**

# MARATHI
# मराठी
## Paper – II
## प्रश्नपत्रिका – II

**Note :** This paper contains **fifty (50)** objective type questions, each question carrying **two (2)** marks. Attempt **all** the questions.

**टीप :** या प्रश्नपत्रिकेत विविध विकल्प असलेले **पन्नास (50)** प्रश्न आहेत प्रत्येक प्रश्नास **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. मराठीतील उपलब्ध अशा पहिला मानल्या जाणाऱ्या अक्षीच्या शिलालेखाचा काळ सांगा
   (A) इ.स. १३१० (B) इ.स. १०१२ (C) इ.स. १२१० (D) इ.स. १०१९

2. उन्हकदेव शिलालेख कोणत्या शकालीत आहे ?
   (A) शक १२०१ (B) शक ११८० (C) शक १२४२ (D) शक १२८९

3. हरपाळदेवाला 'चक्रधर' हे नामाभिधान कोणी दिले ?
   (A) श्री गोविंदप्रभू (B) म्हाईंभट (C) श्री दत्तप्रभू (D) श्री चक्रपाणि

4. 'चंदनाची चोळी माझे अंग-अंग पोळी', ही विराणी कोणी लिहिली ?
   (A) सोपानदेव (B) जनाबाई (C) ज्ञानदेव (D) बहिणाबाई

5. ग्रंथ आणि ग्रंथकारांच्या जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | फादर स्टीफन्स | (i) | उखाहरण |
| (b) | महदंबा | (ii) | हरिश्चंद्राख्यान |
| (c) | चोंभा | (iii) | ख्रिस्त पुराण |
| (d) | मुक्तेश्वर | (iv) | मातृकी रूक्मिणी स्वयंवर |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (iii), | (ii), | (iv), | (i) |
| (B) | (i), | (ii), | (iv), | (iii) |
| (C) | (iv), | (iii), | (iii), | (iv) |
| (D) | (iii), | (iv), | (i), | (ii) |

6. संत एकनाथांच्या गुरुंचे नाव सांगा ?
   (A) श्री जगद्गुरूस्वामी (B) रामदास स्वामी
   (C) जनार्दन स्वामी (D) चिन्मयानंद स्वामी

7. 'यथार्थदीपिका' या ग्रंथाचे कर्ते कोण ?
   (A) रघुनाथपंडित (B) वामनपंडित
   (C) मुक्तेश्वर (D) मोरोपंत

8. साहित्यशास्त्रात ध्वनिसिद्धान्त कोणी मांडला ?
   (A) आनंदवर्धन (B) वामन (C) राजशेखर (D) मम्मट

9. 'महारसांची' संकल्पना कोणी मांडली ?
   (A) भट्टनायक (B) श्री शंकुक (C) अभिनवगुप्त (D) भरतमुनी

10. 'रसगंगाधर', 'साहित्यदर्पण', 'वक्रोक्तिजीवित' आणि 'औचित्यविचारचर्चा' या ग्रंथांची कालानुक्रमाने मांडणी करा.
(A) 'रसगंगाधर', 'वक्रोक्तिजीवित', 'औचित्यविचारचर्चा', 'साहित्यदर्पण'
(B) 'वक्रोक्तिजीवित', 'औचित्यविचारचर्चा', 'साहित्यदर्पण', 'रसगंगाधर'
(C) 'साहित्यदर्पण', 'वक्रोक्तिजीवित', 'रसगंगाधर', 'औचित्यविचारचर्चा'
(D) 'औचित्यविचारचर्चा', 'रसगंगाधर', 'साहित्यदर्पण', 'वक्रोक्तिजीवित'

11. 'वंश', 'परिस्थिती' आणि 'काळ' या विचारत्रयीची मांडणी करून तेनने कोणता समीक्षाविचार सांगितला ?
(A) रूपवादी
(B) शैलीनिष्ठ
(C) आदिबंधात्मक
(D) समाजशास्त्रीय

12. प्लेटोने साहित्याकडे पाहाण्याचे कोणते दोन दृष्टिकोण सांगितले ?
(A) सौंदर्यशास्त्रीय आणि ज्ञानशास्त्रीय
(B) ज्ञानशास्त्रीय आणि नीतिशास्त्रीय
(C) नीतिशास्त्रीय आणि सौंदर्यशास्त्रीय
(D) ज्ञानशास्त्रीय आणि जीवशास्त्रीय

13. जोड्या जुळवा

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | प्लेटो | (i) | न्यू क्रिटिसिझम |
| (b) | ॲरिस्टॉटल | (ii) | रिपब्लिक |
| (c) | टी.एस.ईलियट | (iii) | गोल्डन बाऊ |
| (d) | जेम्स फ्रेझर | (iv) | बर्थ ऑफ ट्रॅजिडी |
| | | (v) | पोएटिक्स |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (ii), | (v), | (i), | (iii) |
| (B) | (v), | (i), | (ii), | (iii) |
| (C) | (iii), | (iv), | (v), | (i) |
| (D) | (i), | (iii), | (iv), | (ii) |

14. आविष्कारवादात 'हेतुरहित हेतूपूर्णतेचा' विचार कोणी मांडला ?
(A) क्रोचे
(B) हेगेल
(C) कांट
(D) नित्शे

15. रुपवादी समीक्षाविचारात एम्पसनने भाषाविषयक कोणती भूमिका मांडली ?
(A) अनेकार्थता
(B) सौंदर्यनिष्ठता
(C) शब्द चमत्कृती
(D) कल्पनाचमत्कृती

16. 'साहित्य-सिद्धान्त' हा कोणत्या ग्रंथाचा अनुवाद आहे ?
(A) न्यू क्रिटिसिझम
(B) थिअरी ऑफ लिटरेचर
(C) प्रिन्सिपल्स ऑफ क्रिटिसिझम
(D) प्रॅक्टिकल क्रिटिसिझम

17. 'नाटककाराच्या शोधात सहा पात्रे' हा नाट्यानुवाद कोणी केला आहे ?
(A) माधव वाटवे
(B) चिं.त्र्यं. खानोलकर
(C) पु.ल. देशपांडे
(D) विजय तेंडुलकर

**18.** जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | ब्राह्मणी राज्य जोरदार | (i) | प्रभाकर |
| (b) | जसा रंग श्रीरंग खेळले | (ii) | होनाजी बाळा |
| (c) | बिकट वाट वहिवाट नसावी | (iii) | रामजोशी |
| (d) | तुझ्या प्रीतीचे दु:ख मला दावू नको रे | (iv) | पठ्ठे बापूराव |
| | | (v) | अनंतफंदी |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (v), | (ii), | (iv), | (i) |
| (B) | (i), | (v), | (iii), | (iv) |
| (C) | (iii), | (i), | (v), | (ii) |
| (D) | (iv), | (ii), | (i), | (v) |

**19.** ह.ना आपटे यांना आधुनिक मराठी कादंबरीचे जनक मानले जाते. त्यांच्या सर्व कादंबऱ्या 'करमणूक' या पत्रातून क्रमशः प्रसिद्ध झाल्या.

(A) संपूर्ण विधान बरोबर
(B) पूर्वार्ध चूक उत्तरार्ध बरोबर
(C) संपूर्ण विधान चूक
(D) पूर्वार्ध बरोबर उत्तरार्ध चूक

**20.** वा.म.जोशी यांनी 'सुशिलेचा देव', 'गोंडवनातील प्रियंवदा' आणि 'आश्रमहरिणी' या कादंबऱ्या लिहिल्या.

(A) वरीलपैकी तीनही कादंबऱ्यांची नावे चुकीची आहेत.
(B) वरीलपैकी दोन कादंबऱ्यांची नावे बरोबर असून एक चुकीचे आहे.
(C) वरीलपैकी एका कादंबरीचे नाव बरोबर असून दोन चुकीची आहेत.
(D) वरीलपैकी तीनही कादंबऱ्यांची नावे बरोबर आहेत.

**21.** म.फुले यांनी पुढीलपैकी कोणत्या काव्यप्रकारात लेखन केले ?

(A) ओवी
(B) अभंग
(C) अखंड
(D) कटाव

**22.** कविता, कथा, नाटक आणि समीक्षा या चारही वाङ्मयप्रकारांत पुढीलपैकी कोणत्या साहित्यिकाने महत्त्वपूर्ण लेखन केले आहे ?

(A) दिलीप पुरुषोत्तम चित्रे
(B) रा.ग. जाधव
(C) रंगनाथ पठारे
(D) सतीश आळेकर

**23.** पुढीलपैकी कोणत्या लेखकाने वैचारिक लेखनाच्या क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे ?

(A) पु.शि. रेगे
(B) मे.पुं. रेगे
(C) सदानंद रेगे
(D) मोरेश्वर रेगे

**24.** पुढीलपैकी कोणत्या नियतकालिकाने मराठी कथेच्या विकासात महत्त्वाचे योगदान दिले ?

(A) विविधज्ञान विस्तार
(B) इंदुप्रकाश
(C) रत्नाकर
(D) शालापत्रक

**25.** 'ती गेली तेव्हा पाऊस निनादत होता' हा काव्यचरण कोणत्या कवीच्या कवितेतील आहे ?

(A) ग्रेस
(B) आरती प्रभू
(C) कुसुमाग्रज
(D) इंदिरा संत

**26.** आदिबंधात्मक समीक्षेची मराठीत सर्वप्रथम मांडणी कोणी केली ?

(A) द.ग. गोडसे (B) गंगाधर गाडगीळ

(C) प्रभाकर पाध्ये (D) गंगाधर पाटील

**27.** जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | पड | (i) | चारुता सागर |
| (b) | नागीण | (ii) | शंकर पाटील |
| (c) | वळीव | (iii) | अमिताभ |
| (d) | नातीगोती | (iv) | आनंद पाटील |
| | | (v) | रा.रं. बोराडे |

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (A) | (iii), | (i), | (ii), | (v) |
| (B) | (iv), | (ii), | (iii), | (i) |
| (C) | (ii), | (v), | (iv), | (iii) |
| (D) | (v), | (iv), | (i), | (ii) |

**28.** कोणत्या दोन नाटककारांना 'सरस्वती सन्मान' मिळालेला आहे ?

(A) विजय तेंडुलकर आणि चिं.त्र्यं. खानोलकर

(B) जयवंत दळवी आणि रत्नाकर मतकरी

(C) विजय तेंडुलकर आणि महेश एलकुंचवार

(D) महेश एलकुंचवार आणि सतीश आळेकर

**29.** पुढीलपैकी कोणते आत्मकथन दलित स्त्रीने लिहिलेले आहे ?

(A) 'बिनपटाची चौकट' (B) 'मिटलेली कवाडे'

(C) 'बाप्तिस्मा ते धर्मांतर' (D) 'जगले जशी'

**30.** 'नदीकाठी' हा ललितलेखसंग्रह कोणाचा आहे ?

(A) श्री निवास विनायक कुलकर्णी (B) अनिल अवचट

(C) प्रतिभा रानडे (D) वासंती मुझुमदार

**31.** 'रूमाल' हा शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आला आहे ?

(A) अरबी (B) तुर्की (C) फार्सी (D) उर्दू

**32.** 'अक्का' हा शब्द कोणत्या भाषेतून मराठीत आला आहे ?

(A) मल्याळम् (B) कन्नड (C) तमिळ (D) तेलुगू

**33.** पुढीलपैकी कोणता शब्द लेखनविषयक नियमांना अनुसरून लिहिलेला आहे ?

(A) विद्याविभूषित (B) विद्याविभुषित

(C) विद्यावीभूषित (D) वीद्याविभूषीत

**34.** 'तारुण्य' हा शब्द पुढीलपैकी काय आहे ?

(A) विशेषनाम (B) सामान्य नाम

(C) भाववाचक नाम (D) विशेषण

**35.** समास ओळखा : 'भोजनभाऊ'

(A) कर्मधारय (B) तत्पुरुष

(C) द्विगू (D) मध्यमपदलोपी

**36.** 'भाऊला हे काम कसे करवेल' ? या वाक्यातील प्रयोग ओळखा

(A) कर्तरी (B) गौणकर्तृक कर्मणी

(C) शक्य कर्मणी (D) भावे

**37.** अरविंद मंगळूरकरांनी मराठीत किती विभक्ती मानाव्यात असे म्हटले आहे ?

(A) चार (B) आठ (C) सात (D) पाच

**38.** 'राज्यात काल सर्वत्र जोरदार पाऊस पडल्यामुळे पिकांची खूप नासाडी झाली.' हे वाक्य पुढीलपैकी कोणत्या प्रकारातील आहे ?

(A) संयुक्त वाक्य (B) केवल वाक्य

(C) मिश्र वाक्य (D) गौण वाक्य

**39.** बहिणाबाई चौधरी यांची कविता कोणत्या बोली भाषेतील आहे ?

(A) डांगी (B) खानदेशी (C) नागपूरी (D) वऱ्हाडी

**40.** 'भाषिक ज्ञानक्षमता' ही संकल्पना कोणी मांडली ?

(A) हॉकेट (B) याकोबसन (C) सोस्यूर (D) चॉम्स्की

**41.** ऐतिहासिक भाषाविज्ञानाचा पाया घालण्याचे श्रेय कोणाला दिले जाते ?

(A) सर विल्यम जोन्स (B) याकोबसन

(C) रोने वेलेक (D) देरिदा

**42.** 'भाषा:, इतिहास आणि भूगोल' हा ग्रंथ कोणी लिहिला आहे ?

(A) अंजली सोमण (B) द.दि.पुंडे

(C) ना.गो. कालेलकर (D) कल्याण काळे

**43.** पुढीलपैकी कोणता ग्रंथ विश्वनाथ खैरे यांनी लिहिला आहे ?

(A) 'भाषा आणि संस्कृती' (B) 'मराठी भाषेचे मूळ'

(C) 'आधुनिक भाषाविज्ञान' (D) 'मराठीचा आर्थिक संसार'

**44.** जाहिरातीला 'पासष्टावी कला' असे म्हणतात कारण

(A) एकूण कलांची संख्या चौसष्ट मानली गेली आहे.

(B) कलावंताप्रमाणेच जाहिरात बनविणारे कलंदर असतात.

(C) कोणत्याही कलेप्रमाणे जाहिरातीसाठी प्रतिभेची आवश्यकता असते.

(D) कलेप्रमाणेच जाहिरातीमुळे पैसा व कीर्ती यांची प्राप्ती होते.

**45.** स्वनविज्ञानाच्या किती शाखा आहेत ?

(A) सहा (B) सात (C) पाच (D) तीन

**पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे उताऱ्याच्या आधारे लिहा.**

संस्कृती म्हणजे समाजाची समग्र जीवनरीती; व्यक्तीने आपल्या समूहाकडून घेतलेला सामाजिक वारसा; विचार-भावना-श्रद्धा यांची सरणी; बाह्य पर्यावरण आणि इतर लोक यांच्याशी जुळवून घेण्यासाठी वापरात येणाऱ्या तंत्रांचा समुच्चय; सामाजिक संघटना, धर्म, आर्थिक व्यवहार या सर्वांचा संस्कृतीत समावेश होतो; संस्कृती म्हणजे सामाजिक वारसा, परंपरा; जगण्याच्या संदर्भात उभे केलेले आदर्श, मूल्ये, नियम; आपल्या भोवतीच्या पर्यावरणाशी जुळवून घेण्यातल्या अथवा एकत्र राहण्यातल्या समस्या सोडवण्याचा मार्ग; वर्तनाविषयीच्या अंतर्गत संबंध असलेल्या कल्पना व प्रतीके यांचा समावेश संस्कृतीत होतो; – संस्कृतीच्या अशा विविध व्याख्या आढळतात. मानवशास्त्रात टायलर यांच्या १८७१ च्या व्याख्येपासून आजतागायत संस्कृतीच्या अनेक व्याख्या केलेल्या आढळतात. संस्कृतीमध्ये मानवनिर्मित उपयुक्त वस्तू, कलावस्तू, श्रद्धा, चालीरिती, रूढी, रीतिरिवाज, भाषा, नीतिनियम, धर्म, मूल्ये, तंत्रज्ञान, दृष्टिकोण या सर्वांचा समावेश केलेला आहे. संस्कृती हे समाज-संक्रमित वर्तन असते.

संस्कृतीचा विचार करणारे दोन दृष्टिकोण आहेत : विश्वात्मकवादी (etic) आणि विशिष्टत्ववादी (emic). विश्वात्मकवादी हा सर्व मानवी संस्कृतींमध्ये आढळणाऱ्या समान गोष्टींच्या आधारे वैश्विक पातळीवर संस्कृतीचा विचार करणारा दृष्टिकोण आहे. विशिष्टत्ववादी एखाद्या संस्कृतीचा तिच्या विशिष्ट सामाजिक व ऐतिहासिक संदर्भात विचार करतात. या दृष्टिकोणातून विशिष्ट संस्कृतीचे 'सघन वर्णन' केले जाते. मात्र हे दोन दृष्टिकोण एकमेकांपासून पूर्णपणे स्वतंत्र राहतात असे नाही.

**46.** संस्कृतीमध्ये पुढीलपैकी कोणत्या गोष्टीचा समावेश होतो ?

(A) समाजाची जीवनशैली, धर्म, आर्थिक व्यवहार

(B) समाजाची जीवनशैली, इतिहास, भौगोलिक रचना

(C) समाजाची जीवनशैली, अंधश्रद्धा, समजुती

(D) समाजाची जीवनशैली, राजकारण, अर्थव्यवहार

**47.** संस्कृतीची पहिली व्याख्या कोणी व केव्हा केली ?

(A) वैदिक ऋषींनी वेदकाळात

(B) टायलर यांनी १८७१ मध्ये

(C) येशू ख्रिस्ताने बायबलमध्ये

(D) गौतमबुद्धांनी इसवी सनाच्या पूर्व काळात

**48.** संस्कृतिविषयक होन दृष्टिकोनांचे स्वरूप कसे आहे ?

(A) परस्परपूरक

(B) समन्वयात्मक

(C) परस्परविरुद्ध

(D) परस्परसंबद्ध

**49.** प्रस्तुत उताऱ्याची लेखनशैली कोणत्या प्रकारची आहे ?

(A) कल्पनारम्य

(B) अलंकारिक

(C) खंडनात्मक

(D) परिचयात्मक

**50.** 'सघन वर्णन' म्हणजे काय ?

(A) विविध संदर्भासह केलेले वर्णन

(B) ठोकळेबाज वर्णन

(C) स्वतंत्र वर्णन

(D) रमणीय वर्णन

**Space For Rough Work**